क्रमांक : १३१

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ / कार्तिक ४, १९४५ शके

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**१३१.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रातील एकूण ५७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ६ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण ५१ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी १५ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ३६ निवेदनांपैकी १३ निवेदने गुरुवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. त्यानंतर प्रलंबित २३ निवेदनांपैकी ९ निवेदने गुरुवार, दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित १४ निवेदनांपैकी ८ निवेदने गुरुवार, दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. एकूण ६ प्रलंबित निवेदनांपैकी ३ निवेदने सोमवार, दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ३ निवेदनांपैकी १ निवेदन शाखेत प्राप्त झाले असून ते यासोबत वितरीत करण्यात येत आहे.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २६ ऑक्टोबर, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव - १ (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

<u>लक्षवेधी सूचना क्र.८१६</u>

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. श्यामसुंदर शिंदे, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.८१६ पुढीलप्रमाणे:-

“दिनांक २१ ऑगस्ट, २०२२ रोजी कंधार पोलीस स्टेशन हद्दीत खुतबे नगर चौरस्ता, नांदेड येथील कंधार जंगतुंग तलावात १) महमद साद महमद सफियोद्दीन (वय १५ वर्षे), २) सय्यद तौहीद सय्यद वहिद (वय २० वर्षे), ३) सय्यद नविद सय्यद वहिद (वय १५ वर्षे), ४) महमद सफियोद्दीन महमद गफुर (वय ४५ वर्षे), ५) महमद विखार महंमद फक्रोद्दीन (वय २३ वर्षे) हे त्याचे कुटुंबासह कंधार येथे बड़ी दर्गा येथे दर्शनासाठी आले होते. दर्शन करून ते सर्वजण नवरंगपुरा येथे जगतुंग तलावाच्या बाजूस भोजनासाठी गेले. भोजन झाल्यानंतर त्यातील एक जण जेवणाचा डबा धुण्यासाठी तलावाच्या पायरीवर गेले असता, त्याचा पाय घसरून तलावात बुडत असल्याने त्याला वाचवविण्यासाठी आणखी दोघे जेण तलावात उतरले परंतू ते सर्वजण तलावात बुडून निधन झाल्याची दुःखद घटना घडली आहे. त्यामुळे मृताच्या कुटुंबियांवर आर्थिक संकट उद्भवले आहे. परिणामी मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत मिळावी व अशी दुर्दैवी घटना पुन्हा होऊ नये याकरिता संबंधित विभागाने योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी भी, या लक्षवेधी मुद्द्याद्वारे करीत आहे”.

---

श्री. गिरीष महाजन, मा. मंत्री (ग्राम विकास विभाग) यांचे निवेदन

“दिनांक २१ ऑगस्ट, २०२२ रोजी कंधार पोलीस स्टेशन हद्दीत खुतबे नगर चौरस्ता, नांदेड येथील कंधार जंगतुंग तलावात १) महमद साद महमद सफियोद्दीन (वय १५ वर्षे), २) सय्यद तौहीद सय्यद वहिद (वय २० वर्षे), ३) सय्यद नविद सय्यद वहिद (वय १५ वर्षे), ४) महमद सफियोद्दीन महमद गफुर (वय ४५ वर्षे), ५) महमद विखार महंमद फक्रोद्दीन (वय २३ वर्षे) हे सर्वजण तलावात बुडून त्यांचा अकस्मात मृत्यू झाल्याची दुःखद घटना घडली आहे,” हे खरे आहे. या प्रकरणी दिनांक २१/०८/२०२२ रोजी पोलिस स्टेशन कंधार, जि. नांदेड येथे अकस्मात मृत्यू नं. ४१/२०२२ कलम १७४ फौजदारी प्रक्रियासहीता प्रमाणे अकस्मात मृत्यू प्रकरण दाखल करण्यात आले आहे.

उक्त प्रकरणी माजी मालगुजारी तलाव मानसपुरी, ता. कंधार (जंगतुंग) या ठिकाणी दुर्घटना होऊ नये, म्हणून तलावाच्या ठिकाणी नागरिकांसाठी घ्यावयाची काळजी बाबतचा सूचना फलक लावण्यात आला आहे. सदर तलावास संरक्षक कठडे बांधण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी पत्र क्र.१९०५/१, दिनांक १७/०१/२०२३ अन्वये जिल्हा वार्षिक योजना पुनर्नियोजन सन २०२२-२३ मध्ये निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

तलावामधील धोकादायक ठिकाण हेरुन त्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ मधील निधीतून जिल्हा परिषदेमार्फत कामे प्रस्तावित आहेत. याबाबत, शासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेला देण्यात आल्या आहेत.

या प्रकरणी मृतांच्या नातेवाईकांना शासनाकडून आर्थिक मदत मिळण्यासाठी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन कंधार, जि. नांदेड यांचेकडून तालुका कार्यकारी दंडाधिकारी, कंधार यांचेकडे अहवाल सादर करण्यात आलेला आहे. याबाबत जिल्हा परिषदेने मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना मृतांच्या वारसांना आर्थिक मदत मिळण्यासाठी संबंधित विभागास योग्य त्या सूचना देण्याची विनंती केली आहे.

**************************************************